# ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, मुस्लिम आदी साहित्य प्रवाहातील संस्कृती दर्शन

**शोभा बसवंत पाटील**

संशोधक विद्यार्थिनी, सौ. भागीरथीबाई शाह कन्या शाळा, शिवाजी चौक, निपाणी.

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.18144096

**ABSTRACT:**

प्रस्तुत लेख १९६० नंतरच्या मराठी साहित्यातील विविध प्रवाहांचा आणि त्यातून घडणाऱ्या संस्कृती दर्शनाचा आढावा घेतो. साहित्य हे केवळ भाषिक आविष्कार नसून समाज आणि संस्कृतीचे प्रतिबिंब असते, हे लेखिकेने स्पष्ट केले आहे. यात प्रामुख्याने ग्रामीण, दलित, स्त्रीवादी आणि आदिवासी साहित्य प्रवाहांचा अभ्यास करण्यात आला आहे. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि विविध समाजसुधारकांच्या विचारांतून या प्रवाहांची निर्मिती कशी झाली, याचे विश्लेषण यात आढळते. गावगाडा, उपेक्षितांच्या वेदना, स्त्रियांचे संघर्ष आणि आदिवासींची मौखिक परंपरा यांतील वास्तववादी चित्रण साहित्याने कसे टिपले आहे, यावर लेख प्रकाश टाकतो. अंतिमतः, हे साहित्य प्रवाह मानवी संस्कृतीचे संवर्धन आणि संक्रमण करण्याचे महत्त्वाचे साधन ठरले आहेत.

**KEYWORDS:**

साठोत्तरी साहित्य प्रवाह, संस्कृती दर्शन, सामाजिक वास्तव, उपेक्षित जाणिवा, अस्मिता.

## प्रस्तावना:

माणूस हा समाजशील प्राणी आहे. माणसाचे संपूर्ण जीवन समाजात घडत असते. त्याला सुखी व सुरक्षित जीवन जगण्यासाठी समाजाची आवश्यकता असते त्यामुळे माणसाचे समाजाशी असणारे नाते विविधअंगी व गुंतागुंतीचे असते. अशा या मानवी जीवनाचे, मानसिक आंदोलनांचे चित्रण साहित्य करते. म्हणजेच साहित्य हे संपूर्ण जीवनाचे चित्रण करते. साहित्यात समाजातील घडणाऱ्या घटनांचे व संस्कृतीचे प्रतिबिंब असते. अर्थात आरशातील प्रतिबिंबाप्रमाणे नसते. साहित्यिक त्याला कलात्मकतेने प्रतिबिंबित करतो.

माणसाच्या अन्न, पाणी, वस्त्र, आसरा, आरोग्य व शिक्षण या प्राथमिक गरजा आहेत. त्यानंतर त्याचे समाजातील स्थान, संस्कृती आणि

साहित्य असा माणसांच्या गरजांचा क्रम लावावा लागेल. कारण प्राचीन काळापासून त्याच्या तणावपूर्ण धकाधकीच्या काळापर्यंत समाजाने आपल्याला व्यक्त करणारा सांस्कृतिक उपक्रम म्हणून साहित्याकडे पाहिले आहे. माणसाचे सगळे अस्तित्व हे समाजसापेक्ष असते तसेच साहित्यही समाज सापेक्ष असते.

साहित्य म्हणजे केवळ एक भाषिक कृती नसते ती एक सांस्कृतिक आणि सामाजिक घटनाही असते. त्यामुळे साहित्याचा संबंध समाजाशी व संस्कृतीशी जोडला जातो. साहित्याची निर्मिती ज्या घटना, प्रसंग व अनुभवातून होत असते त्या पाठीमागे समाज व संस्कृती यांची ऊर्जा असते. साहित्यातून समाजाची संस्कृती, परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते.

प्राचीन काळापासून साहित्याकडे जर आपण नजर टाकली तर आपल्याला असे आढळून येते की तत्कालीन देश, काल, स्थितीचा परिणाम साहित्यावर झालेला दिसतो. मग ती जीवनमूल्ये असतील किंवा समाजकारण असेल, मनोरंजन किंवा उद्बोधन. यातून समाज, संस्कृती आणि साहित्य यांची सांगड घातलेली दिसून येते.

साहित्यातून व्यक्त झालेले सामाजिक विषय, सामाजिक समस्या, तत्कालीन रूढीपरंपरा, चालीरीती, सांस्कृतिक व सामाजिक विचारांची देवाण-घेवाण साहित्यिक आपल्या प्रतिभा व कल्पनाशक्तीच्या जोरावर साहित्यकृतीतून व्यक्त करतो. साहित्यातील समाजाचे स्वरूप लक्षात घेता साहित्यातून केवळ एका समाजाचे वर्णन नसते तर त्या समाजाच्या संस्कृतीचा वास्तवतेने घेतलेला वेध असतो.

साहित्य, समाज आणि संस्कृती यांचे नाते तपासताना असे आढळून येते की, साहित्याद्वारे विशिष्ट काळातील विशिष्ट समाज व त्या समाजाची संस्कृती व्यक्त होत असते. साहित्यात एखाद्या समाजातील विशिष्ट कल्पना, आदर्श, जीवनाविषयीचे त्यांचे संकेत, जीवनाविषयीचे भान इत्यादीचे निष्कर्ष काढण्यासाठी त्या समाजाचे साहित्य एक पुरावा सामुग्री ठरू शकते.

1960 नंतर मराठी साहित्याचे रूप मोठ्या प्रमाणात बदलले. कारण मराठी साहित्यात काही नवीन प्रवाह निर्माण झाले. या साठोत्तरी प्रवाहांनी मराठी साहित्य परंपरेला नवे वळण दिले. मराठी साहित्याला असणाऱ्या मर्यादा व बंधने तोडण्याचा प्रयत्न केला. प्रचलित, प्रस्थापित मराठी साहित्याची मक्तेदारी संपुष्टात आणली. आशय व अभिव्यक्तीच्या बाबतीत साठोत्तरी प्रवाहानी नवे व्यापक रूप घेऊन साहित्याचा परिघ

वाढविला. नवी भाषा, नवी शैली अशा नवतेसह हे प्रवाह मराठी साहित्यात आले. यातील प्रमुख प्रवाह म्हणजे ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य आणि मुस्लिम साहित्य होय.

इंग्रजी शिक्षण, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक व समाजसुधारणेच्या प्रेरणेतून हे प्रवाह निर्माण झाले. समाजातील दुर्लक्षित, उपेक्षित समाजघटक चळवळीच्या सक्रियतेमुळे जागृत झाले. त्यांना आत्मभान आले, बदलत्या काळाबरोबरच आपल्या जगण्याचे संदर्भ शोधू लागले. आपल्या व्यथा, वेदना आणि जाणिवा व्यक्त करण्यासाठी तळमळू लागले.

त्यातूनच साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाह उदयास आले. या प्रवाहातून त्या समाजाच्या तत्कालीन संस्कृतीचे दर्शन आपल्याला पहावयास मिळते.

संस्कृती म्हणजे मानवी समाजाने विकसित केलेले ज्ञान, श्रद्धा, कला, कायदे, परंपरा आणि सवयी यांची एक जटिल व्यवस्था आहे. जी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होते. संस्कृती म्हणजे एका विशिष्ट समाजातील संगीत, नृत्य, चित्रकला, शिल्पकला आणि साहित्य यांची अभिव्यक्ती होय. पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या सामाजिक आणि धार्मिक प्रथा, सण आणि समारंभांचा समावेश असतो. संस्कृती स्थिर नसते तर ती सतत बदलत जाणारी प्रक्रिया आहे. जी मानवी कृती आणि बदलांनुसार आकार घेते. संस्कृतीचे महत्त्व हे त्या समाजाची प्रगती आणि ओळख टिकवून ठेवण्यासाठी आहे. संस्कृतीमुळे भूतकाळाचे जतन होते, वर्तमानाचे भान येते आणि भविष्याची दिशा ठरते. त्यामुळे समाज अधिक समृद्ध होतो. बदलत्या संस्कृतीचे पडसाद साहित्यिक आपल्या साहित्यकृतीतून उमटवत असतो. आज मागे वळून पाहिले असता असे लक्षात येते की अनेक साहित्यिकांनी आपल्या साहित्याच्या आधारे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक परिस्थितीचे चित्रण केले आहे. त्यामुळे तत्कालीन समाजजीवन व सांस्कृतिक जीवन यांची आपल्याला ओळख होते.

### 1) ग्रामीण साहित्य आणि संस्कृती

1945 नंतर मराठी साहित्यात परिवर्तन येण्यास सुरुवात झाली. यामुळे विविध वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले. 1940 या सुमारास महात्मा गांधींनी 'खेड्याकडे चला' असा संदेश दिला. भारत हा खेड्यांचा देश आहे आणि देशातील बहुसंख्य जनता खेड्यात राहते. यांचे जीवन

व मध्यमवर्गीय पांढरपेशा, उच्चवर्णीयांचे जीवन हे खूप वेगवेगळे होते. ग्रामीण समाज व संस्कृती यांना साहित्यात स्थान नव्हतेच. ग्रामीण समाज साहित्यात दुर्लक्षीत होता. सुख-सुविधांचा, शिक्षणाचा अभाव यामुळे उच्चवर्णीयांकडून समाजाचे नेहमीच शोषण होत असे. महात्मा फुले, विठ्ठल शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील इ. च्या प्रयत्नामुळे ग्रामीण भागातील मुले शिकू लागली. नवशिक्षित ग्रामीण तरुणाला ग्रामीण समाज, ग्रामीण जीवन व ग्रामीण जीवनातील समस्या, सुखदुःख त्यांचे चित्रण करून त्यातील वास्तवतेची जाणीव करून द्यावी असे वाटू लागले. त्यातून ग्रामीण साहित्य उदयास आले.

ग्रामीण साहित्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे कृषिव्यवस्था व गावगाड्याचे चित्रण. यामध्ये निसर्ग, शेतकरी, बलुतेदार, सणवार, रुढी, परंपरा, तेथील माती, माळरान, शिवार, गुरेढोरे, दुष्काळ, अतिवृष्टी, पशुपक्षी, जत्रा, पूजा, आहार, पाहुणचार, वेशभूषा, पिके व बोलीभाषा अशा संस्कृतीचा संबंध ग्रामीण साहित्यात येतो.

आपण जर ग्रामीण साहित्याच्या वाटचालीकडे पाहिले तर महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' नंतर 1888 मध्ये कृष्णराव भालेकर यांच्या 'बळीबा पाटील' व 1847 'दुष्काळ' या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. पुढे हरिभाऊ आपटे, धनुर्धारी, ग. ल. ठोकळ, ग. ह. पाटील, श्री. म. माटे, व्यंकटेश माडगुळकर, र. वा. दिघे, शंकर पाटील, रणजीत देसाई, आण्णाभाऊ साठे, रा. रं. बोराडे, आनंद यादव, शंकरराव खरात, महादेव मोरे, बाबुराव बागुल, चंद्रकुमार नलगे, योगिराज वाघमारे, नागनाथ कोत्तापल्ले, राजन गवस, विश्वास पाटील, इंद्रजित भालेराव, रामचंद्र पठारे, उद्धव शेळके, गणेश आवटे अशा कितीतरी साहित्यिकांनी ग्रामीण समाज व संस्कृतीचे चित्रण आपल्या साहित्यामध्ये करून ग्रामीण साहित्य समृद्ध केले. व्यंकटेश माडगुळकरांनी 'माणदेशी माणसे' लिहून ग्रामीण माणसाचे मन, त्याचे वागणे, बोलणे, चालणे, त्याच्या भोवतीचा परिसर, भाषा, संस्कृती, गाव व महारवाडा या सर्वांचे वास्तवदर्शी चित्रण केले आहे.

**2) दलित साहित्य आणि संस्कृती**

1960 नंतरच्या काळात निर्माण झालेल्या विविध प्रवाहांपैकी दलित साहित्य हा एक महत्त्वाचा प्रवाह आहे. दलित साहित्यात देव, धर्म, रुढी, परंपरा यांच्या नावाखाली चिरडलेल्या दलित मनाचे दर्शन घडते. स्वर्ग, पूर्वजन्म, कर्मकांड, आत्मा इ. भूलथापांना प्राधान्य दिले नाही. ज्या शोषणाचा सामान्य माणूस शिकार झाला त्याबद्दल रडत

बसण्यापेक्षा त्याविरुद्ध आवाज उठविला पाहिजे ही जाणीव दलित साहित्यात प्रखरपणे प्रकटली. महार, मांग, चांभार, ढोर, बेरड, कैकाडी अशा विविध पोटजातीतील साहित्यिकांनी आपल्या अनुभवांचे चित्रण केले.

दलितांच्या पिढ्यानपिढ्यांना जे दुःख भोगावे लागले त्याची दलितेतरांना यापूर्वी कल्पना आली नव्हती. या गावकुसाबाहेरील जगाची कुणी दखलच घेतली नव्हती. गावकुसाबाहेरील जगाच्या व्यथा, वेदना, पशुपातळीवरचे जिणे, उपेक्षा यांचे वास्तववादी चित्रण केले. ‘गोलपिठा’ सारख्या काव्यसंग्रहातून नामदेव ढसाळांनी शोषितांचे जगणे रेखाटले. वामन निंबाळकरांनी ‘माय’ कवितेतून दलित स्त्रीचे आयुष्य साकारले. बाबुराव बागुल यांचे ‘जेव्हा मी जात चोरली होती’, ‘मरण स्वस्त होत आहे’, अण्णाभाऊ साठे यांचे ‘खुळवाडी’, ‘भानामती’, ‘गुऱ्हाळ’, ‘कृष्णाकाठच्या कथा’, शंकरराव खरात यांनी ‘बारा बलुतेदार’, ‘तडीपार’, ‘सांगावा’, ‘टिटवीचा फेरा’ इत्यादी साहित्यातून मांग, बेरड, वडार, महार, पोतराज, मुरळी इ. बहिष्कृत जीवितांचे जगणे आणि संस्कृती मांडली. दत्ता भगतांचे ‘वाटा पळवाटा’, प्रेमानंद गज्वी यांचे ‘तनमाजोरी’, ‘देवनवरी’, ‘घोटभर पाणी’, तर भि. शि. शिंदे यांची ‘भूमिपुत्र’, ‘काळोखाच्या गर्भात’ अशा नाटकातून आजपर्यंत उपेक्षित राहिलेले, अंधारात दडलेले, पूर्वजन्मीचे संचित म्हणून निमूटपणे सहन करणारे दलित जीवन व्यक्त केले नाही तर प्रस्थापित समाजव्यवस्थेविरुद्ध करावा लागणारा संघर्षही साहित्यातून मांडला.

**3) स्त्रीवादी साहित्य आणि संस्कृती**

स्त्रीवादी साहित्य ही संकल्पना पाश्चात्यांकडून आपल्याकडे आलेली आहे. प्राचीन काळापासून समाजव्यवस्थेने स्त्रीला नेहमी हीन लेखले. चूल आणि मूल हेच तिचे विश्व बनविले. शास्त्र, पुराणे व स्मृती यात भारतीय स्त्रीला पूर्णतः अडकविली. माणूस म्हणून समाजव्यवस्थेने स्त्रीला नाकारले. लिंगभेदानुसार बाईपणाच्या सनातनी कल्पना तिच्यावर लादण्यात आल्या. स्त्रीकडे दोन दृष्टीने समाज पाहत होता. एक म्हणजे पापी, हडळ, वेश्या अशा विकृत रूपात व दुसरे म्हणजे माता, देवता, शक्ती या देवत्वाच्या रूपात. ही दोन्ही चित्रे वास्तवापासून दूर होती.

स्त्रियांच्या सामाजिक चळवळीमुळे स्त्रीवादी साहित्य ही संकल्पना निर्माण झाली. शिक्षणामुळे स्त्रिया धीटपणे समाजात मिसळू लागल्या. स्वातंत्र्योत्तर काळात पद्मा गोळे व इंदिरा संत यांनी स्त्रियांच्या

बदललेल्या जीवनाचा वरवरचा वेध घेतला. मल्लिका अमर शेख यांनी 'वाळूचा प्रियकर' या काव्यसंग्रहातून स्त्रीचे अनाम अव्यक्त दुःख व्यक्त केले. त्यांनी आपल्या कवितेतून शहरीकरणामुळे बकाल झालेलं आयुष्य, गरीब स्त्रियांची झालेली दयनीय अवस्था यांचे वर्णन करून शहरी स्त्रियांच्या वास्तव जगाचे वर्णन केले. त्यानंतर नीरजा यांच्या 'निरन्वय' या काव्यसंग्रहातून पांचालीच्या दुःखातून स्त्रियांची खास दुःखे व्यक्त केली. अश्विनी धोंगडे यांच्या 'स्त्रीसुक्त' या काव्यसंग्रहातून प्रथमच शहरी जीवनातील मध्यमवर्गीय स्त्रियांच्या जीवनातील अनेक समस्या व प्रश्नांना वाचा फोडण्यात आली. विभावरी शिरूरकरांनी 'कळयांचे निःश्वास' या कथासंग्रहातून प्रौढ कुमारिकांच्या विचारांचे दर्शन घडविले. पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे, काशीबाई कानिटकर, गिरिजाबाई केळकर, ताराबाई मोडक इ. नी स्त्री जीवनाचा विचार आपल्या साहित्यातून वेगवेगळया दृष्टिकोनातून मांडला. बदलत्या सामाजिक परिस्थितीतील स्त्रीच्या विविध भूमिकांचे, तिच्या भोवतीच्या समस्यांचे, तिच्या समोरील आव्हानांचे, मानसिक ताणतणावाचे, तिच्यावरील लैंगिक अत्याचाराचे चित्रण स्त्रीवादी साहित्य करते.

**4) आदिवासी समाज आणि संस्कृती**

आदिवासींचे साहित्य म्हणजे रानावनातील वंचितांचे साहित्य होय. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर म्हणतात, "शेकडो वर्षाच्या साहित्यपरंपरेमध्ये ज्यांचे जीवन कधी साहित्याचा विषय झाला नाही, अशा उपेक्षित, वंचित, दुर्लक्षित, आदिमता प्राप्त झालेल्या जाती जमातीतील जनसमूहाच्या आक्रोशाचा शाब्दिक आविष्कार म्हणजे आदिवासी साहित्य होय." आदिवासी जीवनामध्ये मौखिक परंपरेला खूप महत्त्व आहे. मौखिक वाङ्मय हे आदिवासी संस्कृतीचे महत्त्वाचे अंग आहे. यामुळे आदिवासी संस्कृती मौखिक परंपरेत आजही जिवंत आहे. हजारो वर्षांपासून या भारत भूमीवर वास्तव्य असणाऱ्या दुर्लक्षीत, उपेक्षित आदिवासींचा जीवनप्रवास त्यांच्या लोककथा, लोकसंगीत, लोकनृत्य, उखाणे, म्हणी, चित्रकला आणि शिल्पकला अशा अनेक कलाप्रकारांच्या माध्यमातून आविष्कृत होताना दिसतो.

सरोजिनी बाबर, दुर्गा भागवत, कुसुम व वसंत नारगोळकर व शैलजा देवगावकर अशा साहित्यिकांनी आदिवासी लोकवाङ्मय संकलित केले. अनुताई वाघ, गोदावरी परुळेकर, प्रकाश आमटे, शामराव परुळेकर यासारख्या समाजसेवकांनी आदिम समाजाची सेवा केली. त्यांनी आदिवासी समाजाची परवड, त्यांच्या व्यथा, वेदना, त्यांचे

होणारे शोषण आपल्या साहित्यातून मांडला. अनुताईंनी ‘कोसबाडच्या टेकडीवरून’, गोदावरी परुळेकरांनी ‘जेव्हा माणूस जागा होतो’, नारगोलकरांनी ‘जंगलाचे राजे’ या साहित्यकृतीतून आदिवासी जीवन व संस्कृती लोकांससमोर आणली. प्रस्थापित व्यवस्थेतील स्वर्ग-नरक, पाप-पुण्य या कल्पनांना आदिवासी साहित्य विरोध करते. आदिवासी समाजातील समान कुटुंब व्यवस्था, स्त्रीप्रधान संस्कृती, स्वेच्छा विवाह पद्धत, विधवा पुनर्विवाह ही आदिवासी संस्कृतीची वैशिष्ट्ये आहेत.

समारोप

बदलता काळ व त्या बदलत्या काळातील संस्कृती साहित्याच्या प्रत्येक प्रकारातून व्यक्त झालेली दिसते. साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून समाजातील तत्कालीन संस्कृतीचे वर्णन करून समाजाचे प्रश्न, रूढी, परंपरा, गरजा इत्यादीचे चित्रण केले आहे. हा संस्कृतीचा ठेवा जतन करणे आणि त्याचे संवर्धन करून पुढच्या पिढीकडे हस्तांतरित करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे याची जाणीव ठेवली पाहिजे.

## संदर्भ:

1. सोमन अंजली - साहित्य आणि सामाजिक संदर्भ, प्रतिभा प्रकाशन, पुणे.
2. पाटील म. सु. - साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.
3. वाल्हेकर ज्ञानेश्वर - आदिवासी साहित्य: एक अभ्यास, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.

**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.

**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.